वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		चिंच : शिवाई
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		२०१८
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		हलकी, मुरमाड, डोंगर उताराच्या जमिनीपासुन मध्यम खोल, उत्तम निच-याची
५	हवामान		उष्ण हवामान चांगले मानवते.
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		जून-जुलै
७	प्रती एकरी कलमे		४० कलमे
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	१० X १० मीटर अंतरावर करुन १ X १ X १ मी. आकाराचे खड्डे खोदून द्यावेत. खड्डयात मातीसोबत १५ किलो शेणखत, २.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व ५० ग्रॅम कीडनाशक भुकटी हे मिश्रण टाकावे. रोपांना उन्हाळ्यात सावली द्यावी. जोरदार वा-यापासुन बचाव करण्यासाठी काटक्यांचा आधार द्यावा.
	२	खत व्यवस्थापन	६-७ वर्षानंतर झाडांना २५-३० किलो शेणखत, २.०० किलो युरिया, ३.०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि १.०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश ही खते द्यावीत.
	३	पाणी व्यवस्थापन	--
	४	कीड व्यवस्थापन	--
	५	रोग व्यवस्थापन	चिंचेवर फारसे रोग किंवा कीड आढळुन येत नाही. झाडाच्या मुळावर मुळकुज, तपकिरी कुज, पांढरी कुज यासारख्या बुरशीजन्य रोगांचा त्याचप्रमाणे तर चिंच आणि चिंचोका पोखरणा-या किडींचासुद्धा प्रादुर्भाव आढळुन येतो. मुळावरच्या कुज रोगाच्या नियंत्रणासाठी ब्लायटॉक्स (०.२ टक्का) बुरशीनाशकाच्या द्रावण

		झाडांच्या बुडाला ओतावे. तर चिंचोका पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी एण्डोसल्फान किंवा कार्बावरील (०.१ टक्के) ची फवारणी करावी.
९	**पिकाचा कालावधी**	लागवडीनंतर ०६ वर्षांनी चांगले उत्पादन मिळते.
१०	**उत्पादकता**	५० ते १५० किलो
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**	१. एकूण विद्राव्य घटकाचे प्रमाण (४१.६ टक्के). २. फळाची आम्लता (३१.२ टक्के) ३. नियमीत फळधारणा. ४. रोगास कमी बळी पडतो.
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**	